# के जे'स एज्युकेशनल इन्स्टिट्युट, पुणे

---

## शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्जदारांनी करावयाची प्रक्रिया खालील प्रमाणे राहील.

१. संस्थेची जाहीरात पाहून इंटरनेटच्या माध्यमातून ऑन लाईन अर्ज डाउनलोड करुन भरलेल्या अर्जास आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायाप्रती जोडून आमच्या संस्थेत रु. ५००/- भरुन दिलेल्या मुदतीत जमा करावा.

२. अर्जदार विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी त्यानंतरच्या दिवशी (अकराव्या) आमच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध केल्यानंतर त्यात दुरुस्ती असल्यास मूळ कागदपत्रे घेवून संस्था कार्यालयात त्वरीत भेटावे.

३. बाराव्या दिवशी सकाळी ११.०० वाजेपर्यंत गुणवत्ता यादीतील दुरुस्त्या स्विकारल्या/केल्या जातील. यासंबंधी संस्था घेईल तेच निर्णय बंधनकारक असतील.

४. बाराव्या दिवशी दुपारी दोन वाजता सर्व अर्जदार विद्यार्थी व त्यांचे वडील ( वडील हयात नसल्यास आई वा कायदेशीर पालक- तशा पुराव्यासह) सर्व मूळ कागदपत्रांसह मुलाखतीसाठी हजर राहतील. अर्जदार व वडील / पालक यांचे ओळखपत्र आवश्यक आहे.

५. गुणवत्ता यादीतील हजर असलेल्या विद्यार्थ्यांनी (एका पालकासह) आपली मूळ कागदपत्रे दाखवून त्याची एक छायाप्रत देवून, आमच्या संस्थेत उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्ती जागेची पात्रतेनुसार निवड करुन तसा लेखी अर्ज जमा करायचा आहे.

६. सर्व अर्जदार विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्याच्या शासकीय प्रवेश प्रक्रियेत भाग घेवूनच आमच्या संस्थेत प्रवेश मिळवायचा आहे.

७. अर्जदार विद्यार्थ्यांस ज्या शासकीय प्रवेश फेरीत अशी जागा देय होईल त्याच फेरीत आमच्या संस्थेत येऊन शिष्यवृत्तीची रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम पूर्णपणे भरुन प्रवेश निश्चित करावयाचा आहे. अशी देय जागा त्याच फेरीत अर्जदाराने न घेतल्यास त्याला देवू केलेली शिष्यवृत्ती आपोआप रद्द होईल.

८. प्रवेश घेतल्यावर सत्र सुरुवातीच्या प्रथम दिवसापासून विद्यार्थ्यांनी हजर रहावयाचे असून हजेरीत सातत्य राखावयाचे आहे.

९. सर्व अर्जदार विद्यार्थ्यांना संस्थेतील विशेष खास अभ्यासक्रमास (सशुल्क) हजर राहता येईल व त्यासाठी वसतीगृहाची सोय उपलब्ध असेल.